# प्रकरण ४ थे

## जमा केलेल्या माहितीचे विशदीकरण.

१) प्रास्ताविक.

२) शिक्षक प्रश्नावली व निरीक्षणाचे विशदीकरण.

३) मुख्याध्यापक व त्यांच्या मुलाखतीचे विशदीकरण.

४) विद्यार्थी प्रश्नावलीचे विशदीकरण.

५) पालक प्रश्नावलीचे विशदीकरण.

# प्रकरण ४ थे

## जमा केलेल्या माहितीचे विशदीकरण.

प्रास्ताविक -

आतापर्यन्तच्या ३ प्रकरणात क्रमशः संशोधनाचे स्वरूप, संबंधीत संदर्भ ग्रंथाचा अभ्यास व संशोधन पध्दती या गोष्टीची चर्चा संशोधकाने केली आहे. सदर प्रकरणात जमा केलेल्या माहितीचे विशदीकरण केले आहे.

सुरवातीला संशोधकाने इयत्ता ८ वीचा अभ्यासक्रम व पाठयपुस्तकातील विविध पाठ यांचा अभ्यास करून व हिंदी शिक्षकांच्या मदतीने पाठास उपयुक्त असणा-या शैक्षणिक साधनांची यादी तयार केली ती यादी खाली दिली आहे.

कोष्टक नं. १

पाठास उपयुक्त असलेली शैक्षणिक साधने.

| अ. नं. | पाठाचे नांव | उपयुक्त साधने |
|---|---|---|
| १) | आज्ञापालन, विजय उपहार,<br>सिकंदर और पुरु. | टेपरेकॉर्डर,<br>चित्रे, नकाशे |
| २) | चपलताका प्रतीक, चीता<br>कन्याकुमारीकी यात्रा, सैलानी बंदर | चित्रे<br>नकाशे, टाँच्या |
| ३) | दो महल, राखी, गुडीया, काव्य | टेपरेकॉर्डर. |
| ४) | स्मृति, भारत कोकिला, भगवान किसके. | कहानी संच |
| ५) | निबंध, व्याकरण शुध्द लेखन | विविध तक्ते |
| ६) | ध्यानचंद, हाकी का जादूगर<br>बीमार न होने का दुख, नमो, नमो. | रेडिओ, टेप |

पाठ्यपुस्तकातील पाठात उपयुक्त असलेल्या शैक्षणिक साधनांची यादी केल्यानंतर ही साधने किती शाळात उपलब्ध आहेत याची संख्या खालील कोष्टकात दिली आहे.

कोष्टक नं. २

अध्यापनास उपयुक्त असलेली शैक्षणिक साधने

| अ.नं. | शैक्षणिक साधनांचा प्रकार | शाळांची संख्या | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | रेडिओ | १४ | ४०% |
| २) | टेपरेकॉर्डर | १० | ३४% |
| ३) | विविध नकाशे | ७ | २९% |
| ४) | तक्ते व चित्रे | १५ | ५०% |
| ५) | विविध बालकथा संच | १ | ३.३३% |
| ६) | दूरदर्शन | १ | ३.३३% |
| | एकूण | ३० शाळा | १०० |

बार्शी तालुक्यातील एकूण १४ शाळांत रेडिओ आहेत. त्यापैकी चार ग्रामीण भागातील शाळांचे रेडिओ नादुरुस्त आहेत. एकूण १० शाळांना टेपरेकॉर्डर्स आहेत. परंतु योग्य त्या कॅसेट शाळाजवळ उपलब्ध नाहीत. कवितेच्या कॅसेट जुन्या झालेल्या आहेत. इयत्ता ८ वीच्या अभ्यासक्रमावर आधारलेल्या ४ कॅसेट बाजारात उपलब्ध आहेत. परंतु टेपरेकॉर्डर असलेल्या शाळामध्ये त्या उपलब्ध नाहीत. विविध नकाशे फक्त ७ शाळेत आहेत. नकाशाचे प्रमाण कमी का ? याचे कारण मुख्याध्यापकानी सांगितले, विषय शिक्षक नकाशांची मागणी करीत नाहीत. विविध तक्ते व चित्रे १५ शाळातून आहेत. परंतु यातील ९०% शाळातून त्याचे योग्य प्रकारे जतन केले जात नाही. कारण त्या शाळाना हे साहित्य व्यवस्थित ठेवण्यासाठी सोयीची जागा उपलब्ध नाही. इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त असलेल्या

बालकथा संच फक्त एकाच शाळेतील ग्रंथालयात आहेत. दूरदर्शन संच देखील वैराग येथील एकाच शाळेत आहे. कारण या शाळेत उच्च माध्यमिक शिक्षणाचे वर्ग जोडले आहेत. बार्शी तालुक्यातील एकाही शाळेत संगणक नाही.

या शैक्षणिक साहित्याचा वापर करणाऱ्या शिक्षकाचे प्रमाण खालील कोष्टकात दिले आहे.

कोष्टक नं. ३

शैक्षणिक साधनांचा वापर करणाऱ्या शिक्षकांची संख्या

| अ.नं. | साधनांचा प्रकार | शिक्षक संख्या | शे.प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | रेडिओ | १० | ३३% |
| २) | टेपरेकॉर्डर | ७ | २३% |
| ३) | नकाशे | ६ | २०% |
| ४) | तक्ते व चित्रे | १५ | ५०% |
| ५) | विविध बालकथा संच | १ | ३.३३% |
| | | | |

एकूण १० शिक्षक रेडिओ या शैक्षणिक साधनांचा वापर करतात. शिक्षकांनी सांगितले की रेडिओचे पाठ शालेय वेळेशी विसंगत असतात, म्हणून रेडिओ पाठाचे शाळेत नियोजन करता येत नाही. कारण शाळेच्या मधल्या सुट्टीच्या काळात आकाशवाणी हे रेडिओ पाठ प्रक्षेपित करते. त्याकरिता आकाशवाणीने माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकांच्या व विषय तज्ञांच्या सल्याने आकाशवाणीचे शालेय पाठांच्या बाबतचे वेळापत्रक तयार करावे. टेपरेकॉर्डरचा वापर करताना देखील बऱ्याच कॅसेट जुन्या झालेल्या तर नवीन कॅसेट उपलब्ध नसल्याने त्यांचा वापर शिक्षक करीत नाहीत. शासनाने प्रत्येक शाळेस टेपरेकॉर्डर व शालेय अभ्यासक्रमास उपयुक्त असणाऱ्या कॅसेट

पुरविल्यास टेपरेकॉर्डर या शैक्षणिक साधनाचा आपण वापर करु असे २० शिक्षकानी सांगितले. बार्शी तालुक्याच्या जिल्ह्याच्या ठिकाणी दूरदर्शन केंद्र आहे. पण त्याचे प्रक्षेपण फक्त वैराग या गावापर्यन्त दिसू शकते. सोलापूर येथील दूरदर्शन केंद्राची प्रक्षेपण क्षमता वाढविल्यास बार्शी तालुक्यातील अनेक शाळाना दूरदर्शनचा वापर करता येईल.

शाळेजवळ असलेली वरील शैक्षणिक साधने शिक्षकाना उपलब्ध होण्यात अडचणी येत नाहीत. प्रासंगिक अडचणी आल्यास पर्यायी सोय मात्र करता येत नाही.

संशोधकाने इयत्ता ८ वी च्या वर्गास हिंदी भाषा शिकविणा-या ७ शिक्षकांचे विविध बाजूनी निरीक्षण केले. या निरीक्षणाचे स्वरुप पुढील कोष्टकातून स्पष्ट होते.

कोष्टक नं. ४

बार्शी तालुक्यातील हिंदी विषय अध्यापन करणाऱ्या
निवडक शिक्षकांच्या निरीक्षणाचे स्वरूप.

| अ.नं. | दिनांक | शिक्षकाचे नांव | शाळेचे नांव | घटक | शैक्षणिक साधने |
|---|---|---|---|---|---|
| १) | २०-११-८७ | स्वामी आर.डी. | विद्यामंदीर हा. वैराग | भगवान किसके | रेडिओ |
| २) | २४-११-८७ | जाधव ए.बी. | किसान कामगार विद्यालय उपळे(ठोंगे) | राखी (कविता) | टेपरेकॉर्डर |
| ३) | ४-१२-८७ | अंधारे एस.झेड. | महात्मा गांधी विद्यालय काटेगांव | कारक (व्याकरण) | तक्ते |
| ४) | ७-१२-८७ | बुटे एल.आर. | सुलाखे हायस्कूल बार्शी | ढांचिके आधारपर कहानी | चित्रे |
| ५) | २०-१२-८७ | गाढवे आर.बी. | महाराष्ट्र विद्यालय बार्शी | नमो. नमो | टेप-रेकॉर्डर |
| ६) | २६-१२-८७ | काळे एस.बी. | श्री शिवाजी विद्यालय कारी | कन्याकुमारी की यात्रा | नकाशे |
| ७) | २८-१२-८७ | सौ. महाजन व्ही.पी. | सौ. हि. ने. कन्या प्रशाला, बार्शी | देखो मालिन मुझे न तोडो | टेप-रेकॉर्डर |
| ८) | ४-१-८८ | सौ. देशमुख जे.एन. | संत तुकाराम विद्यालय पानगांव | दो महल | टेप-रेकॉर्डर |
| ९) | ७-१-८८ | देशमुख पी.एन. | आदर्श हायस्कूल गौडगांव | बचन (व्याकरण) | तक्ते |
| १०) | २०-१-८८ | पाटील एस.के. | के. बी. पाटील विद्यालय, चिखर्डे | गुडिया | टेप-रेकॉर्डर |

वरील कोष्टकातून शिक्षक आपल्या अध्यापनात कोणती साधने वापरतात हे स्पष्ट झाले आहे. या शिक्षकांनी आपल्या विषय अध्यापनात शैक्षणिक साधनांचा वापर योग्य त्यावेळी प्रभावीपणे केला. विद्यार्थी पाठय घटकाशी पूर्ण समरस झाले होते. या शिक्षकापैकी २ शिक्षकाना शैक्षणिक साधने वापरण्याचा पुरेसा अनुभव नव्हता, त्यामुळे वर्गात काही वेळ गोंधळ निर्माण झाला. शिक्षेद्वारे वर्ग शांत करावा लागला. हे सर्वच शिक्षक अध्यापनात फलकाचा वापर करतात. तरीही ४ शिक्षकाना फलक लेखनाचे योग्य स्वरुप समजले नव्हते. या शाळांच्या निरीक्षणातून संशोधकाला खालील गोष्टीचाही प्रामुख्याने बोध झाला. तालुक्यातील सर्व शाळातून ग्रंथालयाची सोय आहे. परंतु एकाही शाळेतील ग्रंथालयास ग्रंथपाल नाही. शिक्षकाना व विद्यार्थ्यांना आवश्यक असणा-या संदर्भ ग्रंथाची नोंद घेतली जात नाही. तालुक्यातील ४ शाळातील ग्रंथालय एका लाकडी कपाटात सामावलेली आहेत. तर २ शाळातील ग्रंथालयात हिंदी पुस्तकांची मांडणी स्वतंत्ररित्या केली आहे. हे ग्रंथ ५०० ते ७०० च्या दरम्यान आहेत. इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांना उपयोगी पडणा-या सुलभ भाषेतील पुस्तकांची संख्या नगण्य आहे. त्यामुळे विद्यार्थी ग्रंथाची मागणी करीत नाहीत. प्रत्येक शाळेला जसे ग्रंथालय आहे तसेच ग्रंथपाल असणे आवश्यक आहे. ग्रंथ तेथे ग्रंथपाल हे तंत्र महाराष्ट्र शासनाने राबवावे. शिक्षकाना आवश्यक असणा-या ग्रंथाची उपलब्धता व्हावी. इ. प्रमुख बाबीचा उल्लेख सदर शिक्षकानी केला.

तज्ञाच्या मतानुसार शिक्षकांच्यासाठी ग्रंथालयात पुढील पुस्तके असणे आवश्यक आहे. ही पुस्तके अस्तित्वात असणा-या शाळेची संख्या पुढील प्रमाणे.

कोष्टक नं.' ५

संदर्भ ग्रंथाची संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.नं. | पुस्तकाचे नांव | पुस्तकाचे लेखक | शाळांची संख्या |
|---|---|---|---|
| १) | हिंदी व्याकरण | कामतीप्रसाद गुरु | २ |
| २) | साहित्यीक निबंध | डॉ. गुप्ता एस. | ४ |
| ३) | समिक्षा तत्व | डॉ. यशपाल | १ |
| ४) | काव्यशास्त्र | डॉ. रामत्रिवेदी | ३ |
| ५) | हिंदी उपन्यासका विकास. | डॉ. सरदारसिंह | २ |
| ६) | हिंदी कहानी समीक्षा और संदर्भ. | डॉ. अरूणा चतुर्वेदी | १ |
| ७) | हिंदी साहित्यका इतिहास. | डॉ. रामचंद्र शुक्ल | १० |
| ८) | भारतीय शिक्षा | डॉ. शिवराजसिंह | १ |
| ९) | श्रेष्ट एकांकीका | डॉ. हरेश शर्मा | १ |
| १०) | राम और कृष्ण काव्य की समस्या. | डॉ. मंगला पांडे | १ |
| ११) | रामचरित मानस | तुलसीदास | ३ |

वरील सर्व हिंदी साहित्य हिंदी भाषेतील अनमोल साहित्य म्हणून प्रत्येक शाळेकडे असणे आवश्यक आहे. अशी शिफारस राष्ट्रभाषा सभा, पुणे यानी केली आहे. हिंदी शिक्षकाला उपयुक्त असणारे हे ग्रंथ ७०% शहरी शाळात आहेत आणि त्यांची संख्याही एकापेक्षा जास्त नाही. काही ग्रामीण शाळेत म्हणजे चार शाळेतून वरील पैकी एकही ग्रंथ नाही.

त्यामुळे शिक्षकाना हे संदर्भ ग्रंथ मिळू शकत नाहीत. म्हणून ६०% शिक्षकाना ग्रंथालयाचा उपयोग होत नाही.

विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध असलेली काही बालकथा संग्रह हिंदी भाषेत उपलब्ध आहेत. अशा पुस्तकांची नावे खालील कोष्टकात दिली आहेत.

कोष्टक नं. ६

विद्यार्थ्यांकरिता उपयुक्त असलेली पुस्तके व शाळेची संख्या

| अ.नं. | पुस्तकाचे नांव | लेखक | शाळांची संख्या |
|---|---|---|---|
| १) | हमारे कर्तव्य और दायित्व | के. सिंह | १ |
| २) | हिंदीके श्रेष्ठ बालगीत | जयप्रकाश भारती | १ |
| ३) | ऐसा हिंदुस्थान बने | सुरेंद्र शर्मा | १ |
| ४) | नानक उपदेश | नरेंद्रकुमार अंजान | १ |
| ५) | महापुरुष ईसा मसीह | कृपाकांत मठपति | १ |
| ६) | महाराणा प्रताप | नरेंद्रकुमार अंजान | २ |
| ७) | स्वतंत्र सेनानी | डॉ. मेनारिया | १ |
| ८) | हमारे पर्व | बाळकृष्ण जोशी | १ |
| ९) | बडे घर की बेटी | मुनसी प्रेमचंद | ७ |
| १०) | कर्ण का दान | शाम मनोहर व्यास | २ |
| ११) | चरित्र निर्माण | हेमेंद्र शर्मा | १ |
| १२) | आजादी की पहली लढाई | डॉ. राजेंद्र मोहन भटनागर | १ |
| १३) | खूब लडी मर्दानी | मनहर चौहान | ४ |
| १४) | बापू | रामकृष्ण शर्मा | १ |
| १५) | सुभाषचंद्र बोस | भिमसेन त्यागी | ३ |
| १६) | शांतीदूत नेहरु | विरेंद्र मोहन | २ |
| १७) | सेवा के सौ काम | डॉ. मनोहरलाल | १ |
| १८) | सबसे बडा शत्रू कौन | मदनलाल शर्मा | २ |
| १९) | आओ हम दीपक बने | डॉ. रामदास नादार | १ |
| २०) | संस्कृती के आलेक स्तंभ | डॉ. रामगोपाल गोयल | २ |

9198
A.

वरील सर्व पुस्तकांचा संच फक्त बार्शी येथील सुलाखे हायस्कूल मध्ये आहे. बाकीच्या शाळातून त्यापैकी एखादे दुसरे पुस्तक असलेले दिसून येते. "बडे घर की बेटी" मुनशी प्रेमचंद की प्रसिध्द कहानी व "खूब लडी मर्दानी" हे झाशीच्या राणीच्या जीवनावरील पुस्तक अनुक्रमे ७ व ४ शाळात उपलब्ध आहेत. ही सर्व पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध असल्यास व शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या वाचनाकडे विशेष लक्ष दिल्यास विद्यार्थी हिंदी भाषेतील पुस्तके सुलभतेने वाचू शकतील व त्यांच्यात हिंदी भाषेच्या वाचनाची आवड निर्माण होईल, असे बार्शी शहरातील अनुभवी शिक्षकानी सूचित केले.

संशोधकाने हिंदी शिक्षकांच्या व्यावसायिक तयारीचा अभ्यास करण्याकरिता प्रश्नावलीत ११ प्रश्न विचारले. त्याचे स्पष्टीकरण क्रमशः दिले आहे. हिंदी शिकविणाऱ्या या शिक्षकांचा आपल्या प्रथम पदवीचा प्रमुख विषय कोणता हे हिंदी अध्यापकाच्या दृष्टीने महत्वाचे मानले जाते. पुढील कोष्टकातून शिक्षकांच्या प्रथम पदवीचा विषय कोणता व त्याचे शेकडा प्रमाण काय १ हे स्पष्ट होते.


कोष्टक नं. ७

शिक्षकांच्या पदवीचा खुलासा करणारे कोष्टक.

| अ. नं. | पदवीचा प्रमुख विषय | शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | हिंदी | १८ | ६०% |
| २) | मराठी | ६ | २०% |
| ३) | इंग्रजी | ३ | १०% |
| ४) | संस्कृत | १ | ३.३३% |
| ५) | इतिहास | १ | ३.३३% |
| ६) | भूगोल | १ | ३.३३% |
| | एकूण | ३० | १०० |

वरील कोष्टकावरुन स्पष्ट होते की, ४०% शिक्षकांनी हिंदी विषया-व्यतिरिक्त इतर विषय आपल्या पदवीकरता अभ्यासले आहेत व हे शिक्षक शाळेत हिंदी खेरीज इतर विषयाचे अध्यापन करतात. या ३० शिक्षकापैकी एक शिक्षक "राष्ट्रभाषा पंडीत" आहेत. त्यानी आपल्या पदवीकेसाठी हिंदी अध्यापन पध्दतीची निवड केलेली आहे. या शिक्षकापैकी ६ महिला शिक्षक आहेत. हिंदी विषय शिकविणाऱ्या सदर शिक्षकांनी आपल्या अध्यापनाची दुसरी अध्यापन पध्दती (सेकंड मेथड) मराठी, इंग्रजी, संस्कृत, इतिहास याप्रमाणे निवडली आहे. त्यामुळे हे शिक्षक हिंदी अध्यापना बरोबर इतर विषयाचे अध्यापन करतात.

# शिक्षकांच्या पदवीचा खुलासा करणारा आलेख.



कोष्टक नं. ८

हिंदी खेरीज इतर विषय शिकविणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण दर्शविणारे कोष्टक.

| अ. नं. | विषय | शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | मराठी | ३ | २० |
| २) | इंग्रजी | ६ | ४० |
| ३) | संस्कृत | १ | ६.९ |
| ४) | इतिहास | ५ | ३३.१ |
| | एकूण | १५ | १०० |

कोष्टकावरुन स्पष्ट होते की हिंदी विषय पदवीला घेतलेल्या शिक्षकानी आपल्या अध्यापनाकरिता भाषा हा दूसरा विषय आग्रक्रमाने निवडला आहे. परंतु यापैकी ५ शिक्षक मात्र इतिहास विषय शिकवितात कारण इतिहास हा विषय त्यांच्या पदवी करिता गौण विषय म्हणून होता. संशोधकाला निरीक्षणातून असे दिसून आले की, शिक्षक आपल्या वर्ग अध्यापनात सर्रास मराठी भाषेचा वापर करतात. त्यामुळे हिंदी भाषा श्रवण करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळत नाही व त्यांच्या भाषिक कौशल्याच्या विकासाकडे दुर्लक्ष होते. हे सर्व शिक्षक इयत्ता ८ वी ते १० वी या वर्गांना अध्यापन करतात. शिक्षकाना आपल्या अध्यापनात मातृभाषेचा वापर करणे पसंत नाही, पण विद्यार्थ्यांची शब्द संपत्ती अत्यंत अल्प असल्यामुळे आपणास मातृभाषेचा आधार अध्यापनात घ्यावा लागतो असेही शिक्षकांनी प्रश्नावलीद्वारे निदर्शनास आणून दिले. तसेच मातृभाषेचा वापर न करता हिंदीतूनच अध्यापन करण्यास पुढील अडचणी येतात असेही त्यानी सांगितले.

शिक्षकांनी सांगितलेल्या अडचणी -

१) दुसरी भाषा म्हणून पाठय पुस्तक शिकवणे हेच उद्दीष्ट समोर असते.

२) लेखी परीक्षेला अवाजवी महत्व देण्यात आले आहे.

३) मौखिक परीक्षेला योग्य भारांश माध्यमिक स्तरावर दिला गेला जात नाही.

४) विद्यालयात हिंदी भाषा शिकविण्याकरिता योग्य वातावरण निर्मिती करता येत नाही.

५) इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांची शब्द संपत्ती अतिशय मर्यादीत असते.

६) हिंदी भाषेतून, स्वतंत्रपणे लिहणे, बोलणे, विचार करणे व कल्पना समजून घेणे या बाबी विद्यार्थ्यांना अवघड वाटतात.

७) हिंदी भाषा मातृभाषेच्या मदतीशिवाय या वर्गाच्या विद्यार्थ्यांना समजू शकत नाही.

या अडचणीतून मार्ग काढण्याकरिता शिक्षकांनी काही महत्वाच्या सूचना केल्या आहेत. त्याचे स्वरूप खालील प्रमाणे आहे.

माध्यमिक शाळेत होणाऱ्या वार्षिक परीक्षेचे महत्व कमी करून तोंडी परीक्षेला प्राधान्य द्यावे.

विद्यार्थ्यांच्या वाचन क्षमतेचा विकास, पाठांतर, बोलण्याची शैली, व धीटपणा या गुणांचा विकास होण्यासाठी ४०% गुण मौखिक परीक्षेला ठेवण्यात यावेत.

अशा मौखिक परीक्षा वर्षातून कमीत कमी चार वेळा घेण्यात याव्यात. भाषा शिकणे व शिकवणे म्हणजे पाठयपुस्तक पूर्ण करणे ही अध्यापकाची व विद्यार्थ्यांची समजूत दूर करावी.

विद्यालयात वातावरण निर्मितीकरिता विविध दिन व तज्ञाना निमंत्रित करण्यात यावे.

विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढवण्याकरिता हिंदी वर्ग ग्रंथालय सुरु करावे. या ग्रंथालयात प्रामुख्याने हिंदी कथांचा तसेच बाल काव्यसंग्रहाचा समावेश असावा.

हिंदी भाषा सहजतेने लिहता येण्यासाठी निबंध लेखन व व्याकरण याकडे विशेष लक्ष दिले जावे. दिलेले गृहपाठ तपासून चुकांची दुरुस्ती विद्यार्थ्यांकडून करुन घ्यावी. तसेच हिंदी व मराठी भाषेतील समान अर्थाचे शब्द स्पष्ट करुन सांगावेत असे चार मुख्याध्यापकानी सूचित केले. प्रश्नावलीतील ५ प्रश्नाद्वारे शिक्षकांचा हिंदी भाषेचा अनुभव विचारला होता. पुढील कोष्टकातून शिक्षकांचा अनुभव पूर्ण वर्षात किती झाला हे स्पष्ट केले आहे. तसेच पुढील आलेखातून त्याचे स्वरुप रेखाटले आहे.


कोष्टक नं. ९

शिक्षकांचा हिंदी भाषेच्या अध्यापनाचा अनुभव दाखवणारे कोष्टक

| अ. नं. | अध्यापनाचा अनुभव पूर्ण वर्षात | शिक्षकांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | २ | १ | ३.३३ |
| २) | ३ | १ | ३.३३ |
| ३) | ५ | १ | ३.३३ |
| ४) | ७ | २ | ६.७०% |
| ५) | १० | ४ | १३.३३% |
| ६) | १२ | १ | ३.३३% |
| ७) | १५ | ५ | १६.७०% |
| ८) | २० | ६ | २०% |
| ९) | २२ | २ | ६.७०% |
| १०) | २५ | ४ | १३.३३ |
| ११) | ३० | ३ | १०% |
| | एकूण | ३० | १०० |

साधकांच्या [illegible] अध्यापनाचा अनुभव दर्शविणारा आलेख.





बार्शी तालुक्यातील हिंदी अध्यापन करणारे सर्व शिक्षक प्रशिक्षित पदवीधर आहेत. त्याचे कारण सोलापूर जिल्हयात ३ शिक्षण महाविद्यालये आहेत. शिक्षकांच्या अध्यापनाच्या अनुभवाचे वर्गांतर खालील प्रमाणे करता येते. १ ते १० वर्ष सेवा झालेले ५ शिक्षक आहेत. १० ते २० वर्ष सेवा झालेले १६ शिक्षक आहेत. २० ते ३० वर्षांचा अनुभव असलेले ९ शिक्षक आहेत. हे सर्व शिक्षक आपली २ वर्षांपेक्षा जास्त काळ सेवा झाल्यामुळे त्या त्या संस्थेत कायम झालेले आहेत.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १२ नुसार शिक्षकाना असलेल्या विविध छंदाची माहिती संशोधकाने जमा केली. या विविध छंदावरून शिक्षकांची व्यावसायिक प्रगती जाणून घेणे हा संशोधकाचा हेतू होता.

कोष्टक नं. १०

शिक्षकाचे विविध छंद दाखविणारे कोष्टक

| अ.नं. | छंदाचे नांव | शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | लेखन | १ | ३.९ |
| २) | वाचन | १५ | .५० |
| ३) | अभिनय | ३ | १० |
| ४) | नाटयीकरण | ३ | १० |
| ५) | छंदमंडळाचे सभासद | २ | ६.९ |
| ६) | चित्रकला | २ | ६.९ |
| ७) | संगीत | ३ | १० |
| ८) | भजन, कीर्तन | १ | ३.१ |
| | एकूण | ३० | १०० |

सदर कोष्टकात वाचनाचा छंद असलेले ५०% शिक्षक आहेत. तर फक्त एका शिक्षकाला लेखनाची आवड आहे. चित्रकला व संगीत यांची आवड असणारे २ ते ३ शिक्षक आहेत. आपला दुसरा विषय संस्कृत शिकविणारे शिक्षक भजन व कीर्तन करण्यात आपले उर्वरीत आयुष्य घालवू इच्छितात. शिक्षक आपले छंद वाढविण्याकरिता करीत असलेल्या प्रयत्नांची माहिती खालील कोष्टकावरून दिसून येते.

कोष्टक नं. ११

छंद विकसीत करण्यासाठी शिक्षक करीत असलेले उपक्रम.

| अ.नं. | उपक्रम | शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | ग्रंथ संग्रह करतो | ४ | १३.३३% |
| २) | वाचनालयात नित्य जातो | ८ | २६.६६% |
| ३) | वर्तमानपत्रे विकत घेतो | १० | ३३.३३% |
| ४) | स्वत: मासिक विकत घेतो | २ | ६.६६% |
| ५) | ग्रंथालयाचा सभासद होतो | ३ | १०% |
| ६) | चर्चासत्रात भाग घेतो | २ | ६.६६% |
| ७) | साहित्यीक लेखन करतो. | १ | ३.३३% |
| | एकूण - ७ | ३० | १०० |

वरील कोष्टकावरून ग्रंथ संग्रह करणारे ४ शिक्षक असल्याचे दिसून येते. हे प्रमाण फारच कमी आहे. माध्यमिक शिक्षकांना स्वत: ग्रंथ लिहण्याकरिता काही प्रमाणात अनुदान मिळाल्यास ग्रंथ विकत घेणाऱ्या शिक्षकाची संख्या वाढेल असे अनुभवी शिक्षकानी आपल्या मुलाखतीत सूचित केले. वाचनालयात नित्य जाणारे ८ शिक्षक आहेत. हे सर्व शिक्षक शहरी भागातील आहेत

व ते वाचनालयाचे सभासद आहेत. ग्रामीण भागात सार्वजनिक वाचनालय वैराग व गौडगांव येथे आहेत. तेथील वाचनालयात पुस्तकांची संख्या १ हजाराच्या जवळपास आहे. तर ही पुस्तकें शिक्षकांच्या दृष्टीने उपयुक्त नाहीत असे येथील शिक्षकानी सांगितले. आपली वाचनाची आवड वाढविण्या-करिता शाळेतील शिक्षकाच्या सल्याने विविध ग्रंथ, मासिकें व पाक्षिकें आपल्या शाळेत घेतली पाहिजेत असेही शिक्षकानी सूचित केले. "नवभारत" टाईम्सचे हे एकच हिंदी दैनिक ५ शिक्षक वाचतात. कारण तालुक्यातील ५ शाळातून "नवभारत टाईम्स" हे दैनिक घेतले जाते. मासिकें विकत घेणारे शिक्षक २ आहेत. हे शिक्षकही हिंदी भाषेतील मासिकें विकत घेत नाहीत. एकंदरीत आपल्या छंदाचा विकास करण्याकरिता विशेष प्रयत्न शिक्षक करीत नाहीत.

हिंदी भाषेतून निघणाऱ्या खालील मासिकापैकी कोणती मासिके शिक्षक किती प्रमाणात वाचतात यांचे स्वरूप खालील कोष्टकात दिसून येते.

कोष्टक नं. १२

हिंदी विषयाची मासिके वाचणाऱ्या शिक्षकाचे स्वरूप दाखविणारे कोष्टक.

| अ. नं. | मासिकांचे नांव | शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | कल्याण | २ | ६.६६ |
| २) | गीताधर्म | १ | ३.३३ |
| ३) | सारिका | १ | ३.३३ |
| ४) | धर्मयुग | ४ | १३.३३ |
| ५) | समस्या | १ | ३.३३ |
| ६) | नया शिक्षक | १ | ३.३३ |
| ७) | जनवाणी | १ | ३.३३ |

हिंदी मासिके वाचणाऱ्याची संख्या ११ आहे. मासिके न वाचण्याचे कारण स्पष्ट करताना शिक्षकांनी आपल्या विशेष सूचनामध्ये, आपल्या शाळेत हिंदी भाषेतून प्रकाशित होणारी विविध मासिके उपलब्ध नसतात. ती उपलब्ध करून देण्यात यावीत व त्याकरिता प्रत्येक शाळेनी आपल्या ग्रंथालयाकरिता हिंदी पत्रपत्रिका व मासिकें घ्यावीत असेही सूचित केले. हिंदी भाषेतून शिक्षकांसाठी निघणारी नियतकालिके देखील शिक्षक वाचीत नाहीत. कारण ही नियतकालिके शिक्षकाना ग्रंथालयामार्फत उपलब्ध केली जाऊ शकत नाहीत.

या शिक्षकापैकी एका शिक्षकाने लेखन केलेले आहे. त्यानी आपले "हिंदी व्याकरण और लेखन" हे पुस्तक प्रसिध्द केले आहे. लेखन कार्याकडे शिक्षकानी लक्ष द्यावे म्हणून अध्यापनाच्या विविध बाबीवर लेखन करणाऱ्या शिक्षकाना शासनाने आर्थिक मदत द्यावी असे या शिक्षकाचे मत आहे. राष्ट्रभाषा म्हणून हिंदी भाषेला मान्यता प्राप्त झाल्यानंतर "राष्ट्रभाषा सभा पुणे" "राष्ट्रभाषा परिषद वर्धा इ. संस्थामार्फत हिंदी हिंदी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी वर्ग चालविले जात आहेत. या तालुक्यात "महाराष्ट्र राष्ट्रभाषा, पुणे" "राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धा" या संस्थेमार्फत वर्ग चालविणारे प्रत्येकी २ शिक्षक आहेत. त्यांच्या वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या ५० पेक्षा जास्त नाही. वर्ग चालविणाऱ्या शिक्षकानी काही सूचनाही केल्या आहेत. त्यांच्या मतानुसार वर्ग चालविणाऱ्या शिक्षकाना त्या त्या संस्थाकडून योग्य मानधन मिळाल्यास वर्ग चालविणाऱ्या शिक्षकांची संख्या वाढेल. तसेच केंद्र शासनाने राष्ट्रभाषेच्या प्रसाराचे कार्य करणाऱ्या शिक्षकाना जादा वेतन देण्याची सोय करावी. व हिंदीच्या पंडीत या परीक्षेस पदवी समकक्ष मानण्यात यावे व अशा पदवीधारकाला प्रशिक्षण घेता यावे म्हणून शिक्षण महाविद्यालयातील प्रवेशासाठी ५% जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

हिंदी विषय अध्यापनात विविधता आणण्यासाठी व शिक्षकांच्या शैक्षणिक कार्यात अंतरक्रिया घडवून आणण्यासाठी हिंदी शिक्षकांच्या राज्य जिल्हा व तालुका स्थरावर जी कृती सत्रे घेतली गेली अशा तालुका स्थरावरील कृतिसत्रात ७ शिक्षकानी भाग घेतला. जिल्हाकृती सत्रात २ शिक्षकानी भाग घेतला तर १ शिक्षकाने जिल्हा कृतीसत्रात मार्गदर्शक म्हणून काम केले. शिक्षकानी अशा कृतीसत्रात वर्षातून एकदा तरी भाग घेणे आवश्यक ठरविले गेले पाहिजे.

तालुक्यातील एकाही शाळेत हिंदी विषयाचे स्वतंत्र हस्तलिखीत निघत नाही. त्यामुळे हस्तलिखीताद्वारे देखील शिक्षक व विद्यार्थी आपले लेखन कार्य करीत नाहीत. प्रत्येक शाळेतून हिंदी विषयाचे हस्तलिखीत निघाल्यास त्याद्वारे विद्यार्थी हिंदी भाषेतून आपले विचार व्यक्त करु शकतील.

बार्शी शहरातील एका माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांची वक्तृत्व स्पर्धेसाठी तयारी करून घेतली जाते. मात्र सन १९८७-८८ यासाली गौडगांव, उपळे (दुमाला), वैराग व पानगांव या शाळानी देखील आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी प्रयत्न केले. सदर स्पर्धा बार्शी येथील सुलाखे हायस्कूल येथे झाल्या. विशेष म्हणजे यास्पर्धा हिंदी भाषेतून घेण्यात आल्या. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून संशोधकाने काम पाहिले. अशा स्पर्धात तालुक्यातील इतर शाळानी भाग घेण्यासाठी हिंदी शिक्षकानीच विशेष प्रयत्न केले पाहिजेत. असे बार्शी शहरातील मुख्याध्यापकानी नमूद केले. तालुका हिंदी शिक्षक मंडळ अशा स्पर्धा घेण्याची योजना आखणार आहे. असेही बार्शी शहरातील हिंदी विषय शिक्षकांनी सांगितले. स्पर्धेत पहिल्या ३ क्रमांकाना बक्षीसे देण्यात येणार आहेत. हिंदी भाषेच्या वक्तृत्व स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या भाषण कलेचा विकास होण्यास मदत होईल. या स्पर्धांकरिता बार्शी तालुक्यातील माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकही प्रयत्नशील राहणार आहेत. प्रश्नावलीत एक प्रश्नाद्वारे शिक्षक हिंदी विषय अध्यापनात कोणकोणत्या अध्यापन

पध्दतीचा वापर करतात व त्याना विविध अध्यापन पध्दतीचा वापर करताना कोणकोणत्या अडचणी येतात यांची माहिती विचारली होती.

शिक्षक हिंदी अध्यापनाच्या विविध पध्दतीपैकी पाठय पुस्तक पध्दतीचाच प्रामुख्याने वापर करतात. याची कारणे सदर शिक्षकांनी खालील प्रमाणे सांगितली.

१) इतर अध्यापन पध्दतीचा वापर केल्यास अभ्यासक्रम नियोजित वेळात पूर्ण होत नाही.

२) इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांची मातृभाषेच्या व्याकरणाची तयारी अपुरी असते. त्यामुळे अध्यापनात पाठयपुस्तक पध्दतीचाच वापर करतात.

३) रचनेच्या दृष्टीने मातृभाषेची रचना व हिंदी भाषेची रचना यातील स्वाभाविक फरक विद्यार्थ्यांच्या लक्षात येत नाही.

४) विद्यार्थ्यांच्या उच्चारावर मातृभाषेचा परिणाम झाल्यामुळे हिंदी पाठय पुस्तक त्याना योग्य रितीने वाचता येत नाही. याकरिता अध्यापन चालू असताना विद्यार्थ्यांच्या समोर पाठयपुस्तक असणे आवश्यक वाटते.

५) इतर पध्दतीचा वापर करावयाचा झाल्यास शाळेत योग्य वातावरण निर्माण करता येत नाही.

६) विद्यार्थ्यांचे हिंदी भाषेविषयीचे पूर्वज्ञान फारच त्रोटक असते. तसेच त्यांची शब्दसंपत्ती देखील अपेक्षेइतकी नसते. त्यामुळे आपणास पाठयपुस्तक पध्दतीचा वापर करावा लागतो. असे शिक्षकांनी सांगितले.

बार्शी तालुक्यातील माध्यमिक शाळातील इयत्ता ८ वी च्या वर्ग अध्यापनाचे निरीक्षण केले असता संशोधकाला हिंदी अध्यापन करणाऱ्या ५ शिक्षकांचे उच्चार; **हिंदी** भाषेच्या उच्चाराप्रमाणे नव्हते असे दिसून आले. तर काव्य अध्यापन होत असताना रसनिष्पत्ति होत नव्हती असेही जाणवले. काव्य शिकवणे म्हणजे शब्दांचा अर्थ सांगणे एवढेच कार्य वर्गात चालू होते.

खालील कोष्टकात शिक्षक वापरीत असलेल्या विविध पध्दतीचे स्वरूप दिसून येते.

कोष्टक नं. १३

शिक्षक अध्यापनात वापरीत असलेल्या विविध शैक्षणिक पध्दती दर्शविणारे कोष्टक.

| अ.नं. | वापरीत असलेली पध्दती | शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | पाठय पुस्तक प्रणाली | २० | ७७.१ |
| २) | स्वाभाविक प्रणाली | २ | ६.२% |
| ३) | व्याकरण व अनुवाद प्रणाली | ३ | १०% |
| ४) | वेस्ट प्रणाली | २ | ६.२% |
| ५) | नाटयीकरण | ४ | १३% |
| ६) | व्याख्यान प्रणाली | १ | ३.१% |
| ७) | चर्चा प्रणाली | ८ | २७% |
| ८) | स्वाध्याय प्रणाली | १० | ३३% |
| ९) | प्रश्नोत्तर प्रणाली | ५ | १६% |

शिक्षक आपल्या वर्ग अध्यापनात जास्तीत जास्त प्रमाणात पाठयपुस्तक प्रणालीचा वापर करतात. वर्ग अध्यापनाच्या निरीक्षणातून संशोधकाला असे दिसून आले की एकाही शिक्षकाने हेतूप्रश्न फलकावर लिहला नव्हता. तसेच पाठयांशाच्या लेखकाचे नांव फलकावर लिहले गेले नव्हते. निरीक्षण केलेल्या ४०० विद्यार्थ्यापैकी १६० विद्यार्थ्यांनी गृहपाठ पूर्ण केले होते. हरबार्टच्या पाय-याचा वापर पाठयपुस्तक पध्दतीत होत नव्हता. वरील शिक्षकापैकी २ शिक्षक स्वाभाविक पध्दतीचा वापर करतात, परंतु ते मराठीतून हिंदी भाषेचा अनुवाद करून सांगतात. हिंदी भाषेतील पर्यायी सोपे शब्द व त्याचे

स्पष्टीकरण शिक्षक करीत नाहीत. विद्यार्थ्यांना घटकाचा आशय समजत नाही. बार्शी तालुक्यातील एकूण ४ शाळातून पाठ्यपुस्तकातील "सिकंदर और पुरु" या सुदर्शन लिखीत नाट्य रचनेचे नाट्यीकरण करणारे शिक्षक आहेत. या शिक्षकाना आपल्या महाविद्यालयीन अध्ययनाच्या काळात विशेष प्रमाणपत्र मिळाली आहेत. व्याख्यान प्रणालीद्वारे अध्यापन करणारे एक शिक्षक आहेत. ते प्रत्येक पाठाचे भाग पाडून त्यावर सोप्या भाषेत व्याख्यान प्रणालिद्वारे निवेदन करतात. शिक्षकांचा आवाज व अभिनय उत्तम होता. त्यामुळे विद्यार्थी पाठात तल्लीन झाले होते. विद्यार्थ्यांचे विषय ज्ञान वाढावे, तसेच विषयाची गोडी निर्माण व्हावी म्हणून माध्यमिक शाळेत काही उपक्रम राबविले जातात. असे उपक्रम किती प्रमाणात दरवर्षी राबविले जातात, ते खालील कोष्टकावरून स्पष्ट होते.

कोष्टक नं. १४

बार्शी तालुक्यातील माध्यमिक शाळेत राबवले जाणारे उपक्रम

| अ. नं. | उपक्रमाचे नांव | शाळांची संख्या | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | पूरक वाचन | १ | ३.९ |
| २) | पाठांतर | १५ | ५० |
| ३) | स्पर्धा | ५ | १६ |
| ४) | विविध दिन | २ | ६.९ |
| ५) | परिसंवाद | २ | ६.९ |
| ६) | रेडिओ व्याख्यान | १ | ३.९ |
| ७) | काव्य गायन | ४ | १३.३३ |
| ८) | चित्रकला | २ | ६.९ |

एकूण माध्यमिक शाळातील ५०% शाळातून पाठांतर हा उपक्रम राबविला जातो. विद्यार्थ्यांना त्यांच्या पाठयपुस्तकातील सर्व कविता पाठ आहेत. विद्यार्थी कविता लयबध्द व तालबध्द स्वरात म्हणतात, परंतु पाठ असलेली कविता त्याना लिहता येत नाही. वार्षिक परीक्षेत कवितेच्या पाठांतरावर प्रश्न विचारला जात असल्यामुळे विद्यार्थी कविता पाठ करतात. असे विषय शिक्षकानी सांगितले. कविताना योग्य चाली लावल्या व कवितेच्या कॅसेट आणून मुलांना त्या ऐकवल्या तर काव्यविषयी मुलांमध्ये अधिक गोडी निर्माण होण्यास मदत होईल असे शिक्षकांनी सांगितले. परंतु मुख्याध्यापक याबाबीकडे लक्ष देत नाहीत असा खुलासा ५०% शिक्षकानी म्हणजे १५ शिक्षकानी केला. तसेच या शिक्षकानी असे सांगितले की, शाळा प्रमुखानी हिंदी अध्ययन अध्यापनाकडे जाणीवपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच शिक्षकानी मागणी केलेली शैक्षणिक साधने त्या त्यावेळेस पुरविली पाहिजेत.

बार्शी तालुक्यातील एका शाळेतच पूरक वाचन हा उपक्रम राबविला जातो. हा उपक्रम न राबविला जाण्याची कारणे सांगताना शिक्षकांनी खालील गोष्टी स्पष्ट केल्या.

१) पाठयपुस्तकातील पाठांच्या खाली पूरक वाचनाकरिता उपयुक्त असणाऱ्या पुस्तकांची नावे दिली गेली नाहीत.

२) शाळातून इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांना उपयोगी पडतील अशी पुस्तके नाहीत. त्यामुळे या उपक्रमाकडे लक्ष दिले जात नाही.

३) तालुक्यातील एकूण ६ शाळातून पाठांतराच्या स्पर्धा घेतल्या जातात. परंतु स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य प्रलोभन दिले जात नाही. त्यामुळे १० ते १५ विद्यार्थ्यापेक्षा जास्त विद्यार्थी स्पर्धेत भाग घेत नाहीत.

४) लेखी स्पर्धा कोणत्याही शाळेत राबविल्या जात नाहीत, याचे कारण स्पष्ट करताना शिक्षकांनी सांगितले की अशा स्पर्धा घेतल्यास अभ्यासक्रम संपविण्यास वेळ पुरणार नाही.

५) परिसंवाद २ शाळातून तर आकाशवाणी पाठ एका शाळातून ऐकविले जातात. भाषिक खेळ, हस्तलिखीत हे उपक्रम कोणत्याही शाळेत राबविले जात नाहीत. बहुतेक सर्व शाळातून काव्य वाचन विद्यार्थी उत्तम रितीने करतात. गीतमंचाचा परिणाम विद्यार्थ्यांच्या मनावर चांगला झाला आहे. चित्रकलेचा विकास होण्याकरिता बार्शी तालुक्यातील ४ शाळातून विशेष प्रयत्न केले जातात. या शाळातून चित्रकलेच्या परीक्षा घेतल्या जातात. या चारही शाळा शहरी भागातील आहेत. ग्रामीण भागातील शाळात चित्रकला हा विषय नावापुरताच आहे. इयत्ता ८ वी च्या पाठय पुस्तकातील पाठावर आधारित कोणते उपक्रम सदर शाळातून राबविले जातात, हे ही संशोधकाने आजमावले आहे. खालील कोष्टकात विविध उपक्रम राबवल्या जाणा-या शाळाचे प्रमाण दिसून येते.

कोष्टक नं. १५

क्रमिक पुस्तकातील पाठावर आधारीत उपक्रम आयोजित करणा-या शिक्षकाचे प्रमाण

| अ.नं. | पाठाचे नांव | उपक्रमाचे नांव | शिक्षक संख्या | शे.प्र. |
|---|---|---|---|---|
| १) | आज्ञापालन, विजय उपहार, युध्द का बलिदान. | परिसंवाद | ३ | १० |
| २) | राखी, मजदूर, दो महल गुडिया, फिर महान बन। | पाठांतर स्पर्धा | १५ | ५० |
| ३) | हिमालय | सहल | २ | ६.९ |
| ४) | मेरे गाँव के त्यौहार, सलोनी बंदर, नमो: नमो: | स्पर्धा निबंध लेखन | ५ | १६ |
| ५) | सिकंदर और पुरु | नाटयछटा | १ | ३.९ |
| ६) | सिंहासन के दावेदार | नाटयछटा | १ | ३.९ |

वरील कोष्टकात शाळेत विद्यार्थ्यांचे परिसंवाद आयोजित करणारे एकूण ३ शिक्षक आहेत. पाठांतराच्या स्पर्धा घेणारे १५ शिक्षक आहेत. तर पाठ घटकाच्या आधारावर निबंध स्पर्धा घेणारे ५ शिक्षक आहेत. एका शाळेतून पाठयपुस्तकातील "सिकंदर और पुरु" व "सिंहासन के दावेदार" या पाठाच्या नाटयछटा सादर केल्या जातात. या तालुक्यातील २ शाळातून इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांच्या सहली वर्षातून एक वेळा निघतात. उपक्रम राबविण्याच्या या प्रमाणाबाबत मुख्याध्यापकानी असे सांगितले, भाषा विषयाचा बोजा इतर विषयाच्या मानाने विद्यार्थ्यांवर जास्त पडतो व इंग्रजीला जास्त प्राधान्य दिले जाते. त्यामुळे हिंदी भाषेकडे व त्यांच्या विविध उपक्रमाकडे विशेष लक्ष दिले जात नाही, त्याच प्रमाणे विषय शिक्षक उपक्रम राबवण्यास उदासिन असतात. शिक्षकाना विविध अध्यापन पध्दती माहित आहेत. कारण हे सर्वच शिक्षक प्रशिक्षित आहेत. तरीपण या विविध पध्दती वापरण्यात शिक्षकांना कांही अडचणी येतात. त्या अडचणीचे स्वरूप खालील कोष्टकावरून दिसून येते.

कोष्टक नं. १६

अध्यापनात येणा-या विविध अडचणी दर्शविणारे कोष्टक

| अ.नं. | अध्यापनात येणा-या अडचणी | शिक्षक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | आर्थिक बोजा पडतो | १ | ३.३३ |
| २) | वेळ वाया जातो | ५ | १६.९९ |
| ३) | श्रम अधिक करावे लागतात | २ | ६.६६ |
| ४) | अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होत नाही | २० | ६७ |
| ५) | मुलाचे सहकार्य मिळत नाही | २ | ६.६६ |
| ६) | परीक्षा निकालावर परिणाम होतो | ३ | १० |

वरील अध्यापनात येणाऱ्या अडचणीमुळे शिक्षकाना विविध अध्यापन पध्दती राबविता येत नाहीत. पाठय पुस्तक पध्दती ही अध्यापनास सुलभ पध्दती आहे. त्यामुळे आपण याच पध्दतीचा वापर करतो. असे शिक्षकांनी सांगितले. ९५% शिक्षक पाठाचे टाचण तयार करीत नाहीत. शिक्षक आपल्या एका शालेय तासात किती वेळ देतात हेही प्रश्नावलीद्वारे संशोधकाने आजमावले आहे.

कोष्टक नं. १७

एका घटकाच्या अध्यापनासाठी (३५ ते ४० मि.) तयारी करण्यास शिक्षक देत असलेला वेळ.

| अ.नं. | घटक | तयारीस लागणारा वेळ २ ता. | १ ता. | ४० मि. | ३० मि. | शिक्षक |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | गद्यपाठ | ४ | ८ | १३ | ५ | ३० |
| २) | पद्यपाठ | २ | १० | १५ | ३ | ३० |
| ३) | व्याकरण | ० | १४ | १० | ६ | ३० |
| ४) | निबंध | ० | १३ | ११ | ६ | ३० |
| ५) | कहानी | ० | ८ | १५ | ७ | ३० |
| ६) | नाटयीकरण | ० | २ | ० | ० | २ |

वरील कोष्टकावरून नाटयीकरणासारख्या घटकाला फक्त दोन शिक्षक प्राधान्य देतात असे दिसून आले. हे दोन शिक्षक पाठयांशाचे नाटयीकरण करून घेतात. पाठय पुस्तकात नाटयीकरणास वाव असणारे दोन पाठ आहेत. त्याच त्या पध्दती वापरण्यापेक्षा अध्यापनात नाटीकरणाद्वारे ह्या पाठाचे अध्यापन केल्यास मुलांनाही त्या विषयाची आवड निर्माण होईल व त्यांनी

कृतीप्रधान बनवता येईल. कारण नाटयीकरणात अनेक प्रकारच्या कृती करण्यास संधी असते. पण शिक्षक या घटकाकडे लक्ष देत नाहीत. यावरून शिक्षकाना विविध अध्यापन पध्दतीचा अवलंब करण्यात रस दिसून येत नाही. व्याकरण निबंध व कहानी अध्यापनाच्या तयारीला ४० मिनिटे वेळ देणाऱ्या शिक्षकाचे प्रमाण ७०% जास्त आहे. भाषेच्या दृष्टीने व्याकरण व निबंध याना विशेष महत्व देणे आवश्यक आहे असे भाषा शास्त्रज्ञ सांगतात. एकंदरीत शिक्षक आपल्या विषय अध्यापनाच्या तयारीस फारसा वेळ देत नाहीत. परंतु आपल्या अध्यापनात सुधारणा व्हावी असे त्याना वाटते, म्हणून त्यांनी खालील प्रकारच्या मदतीची अपेक्षा केली आहे.

कोष्टक नं. १८

अध्यापन पध्दती सुधारण्याबाबत शिक्षकांच्या अपेक्षा

| अ. नं. | उपाय | शिक्षक संख्या | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | दिग्दर्शित पाठ व्हावेत | १० | ३३.३३ |
| २) | महाविद्यालयाशी संपर्क साधावा | ६ | २०% |
| ३) | वैयक्तिक मार्गदर्शन मिळावे | ४ | १३.३३ |
| ४) | सेवांतर्गत संधी मिळाव्यात | ५ | १६.७० |
| ५) | विस्तार सेवा केंद्राची मदत व्हावी | ५ | १६.७० |
| ६) | तज्ञाच्या भेटी व व्याख्याने ऐकावीत | ७ | २४.१ |
| ७) | संशोधन साहित्य उपलब्ध व्हावे | ५ | १६.७० |

शिक्षण महाविद्यालयाने आपल्या शाळेत येऊन दिग्दर्शित पाठ घेवून दाखवावेत. तसेच अध्यापन पध्दतीत सुधारणा घडवून आणण्यास मदत करावी. असे वाटणारे १० शिक्षक आहेत. तसेच वारंवार महाविद्यालयाशी संपर्क साधता यावा की ज्यामुळे नवनवीन तंत्रज्ञान, मूल्यमापन पध्दती व सूक्ष्म अध्यापन

संकल्पना अधिक प्रमाणात समजेल, असे या शिक्षकानी सांगितले. ४ शिक्षकानी आपल्या काही वैयक्तिक अडचणी आहेत, त्या वैयक्तिक मार्गदर्शनाने दूर होतील असे स्पष्ट केले. त्यानी सांगितलेल्या अडचणी अशा -

वर्गात विषयानुरुप वातावरण निर्माण करता येत नाही. कोणत्या घटकाला कोणते अध्ययन अनुभव द्यावे ते नेमके समजत नाही.

विविध वेतकांचा वापर कसा करावयाचा हे नेमके जमत नाही. या गोष्टी शिक्षण महाविद्यालयातील प्राध्यापकानी वैयक्तिक मार्गदर्शनातून पटवून द्याव्यात असेही या शिक्षकांनी सांगितले. आपणास सेवांतर्गत सोयी मिळाव्यात. शाळेने हिंदी विषय तज्ञांच्या चर्चासत्रात भाग घेण्यास तसेच हिंदी परिषदांच्या बैठकीना उपस्थित राहण्याची संधी द्यावी. विस्तार सेवा केंद्रानी राष्ट्रभाषा प्रचार व प्रसार कार्यास प्रोत्साहन देण्याकरिता, हिंदी शिक्षकाकरिता शिक्षक प्रबोधिनी स्थापन करून वारंवार चर्चा घडवून आणाव्यात असे पाच शिक्षकानी सांगितले. तर हिंदी भाषिक तज्ञाच्या भेटी घेता याव्यात व त्यांची व्याख्याने ऐकता यावीत असे २ शिक्षकानी सांगितले. सर्वच शिक्षकाचे आपल्या शाळेच्या मुख्याध्यापकानी हिंदी भाषेच्या अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या बाबतीत उदार दृष्टीकोन ठेऊन त्यांनी वेळोवेळी आपल्या अध्यापनात सुधारणा करण्याकरिता विविध संधी उपलब्ध करून द्याव्यात असे मत आहे. मात्र २ शिक्षकांनी असे सांगितले की शासनाकडून आलेली विविध परिपत्रके शाळा प्रमुख वाचावयास देत नाहीत. अध्यापन कार्य करीत असताना शिक्षकांना अनेक घटकाचा प्रतिसाद व मदत आवश्यक असते. हिंदी अध्यापनास सुधारणा करण्यासाठी शिक्षकाना कोणाकोणाची मदत होते, हे पुढील कोष्टकातून दिसून येते.

कोष्टक नं. १९

शिक्षकांना अध्यापनात मदत करणारे घटक.

| अ.नं. | मदत करणारे घटक | शिक्षक संख्या | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | सहकारी | १० | ३३.३३ |
| २) | मुख्याध्यापक | ७ | २४.१ |
| ३) | विद्यार्थ्यांचा प्रतिसाद | २ | ६.६६ |
| ४) | पालकांचा प्रतिसाद | ४ | १३.३३ |
| ५) | सेवांतर्गत संधी | - | |

आपल्या सहकार्यांची वारंवार मदत होते. असे एकूण १० शिक्षकानी सांगितले तर शाळेच्या मुख्याध्यापकाचा प्रतिसाद आपणास मिळत असल्यामुळे अध्यापन प्रभावी होते असे ७ शिक्षकानी सांगितले. तर ४ शिक्षकानी आपणास विद्यार्थ्यांचा व पालकांचा प्रतिसाद चांगला मिळतो असे सांगितले. इयत्ता ८ वी च्या पाठ्यपुस्तकातील "सिंहासन के दावेदार" व "स्मृती" हे दोन पाठ अनुक्रमे अवघड विषय व संदर्भ लागत नाहीत, या सदराखालि ते अध्यापनास कठीण असल्याचे शिक्षकानी स्पष्ट केले. त्याच प्रमाणे ७ शिक्षकांनी पाठय पुस्तकांतील कवितांची संख्या वाढवावी व त्या विद्यार्थ्यांच्या आकलन शक्तीचा विचार करुन निवडाव्यात असे नमूद केले.

सूक्ष्म अध्यापनाचे तंत्र योग्य पध्दतीने समजले नाही असे मत एकूण ४ शिक्षकानी व्यक्त केले, तर १६ शिक्षकांनी सूक्ष्म अध्यापनाच्या तंत्रामुळे आपणास अध्यापनाची विविध कौशाल्य आत्मविश्वासाने वर्गात स्पष्ट करता येऊ लागले. त्यामुळे अध्यापनात विविधता आणता आली व विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील दूरी कमी झाली असे सांगितले. बार्शी शहर व तालुक्यातील सर्वच शाळातून मूल्यमापन तंत्राचा वापर केला जातो. शाळेतून वर्षात चार घटक चाचण्या घेतल्या जातात. त्यामुळे घटक चाचणी तयार करणे,

घटक नियोजन करणे, वार्षिक नियोजन करणे इत्यादी गोष्टी शिक्षकाना चांगल्या माहित आहेत. याखेरीज प्रश्नावलीतील शेवटच्या प्रश्नाद्वारे शिक्षकांच्या अध्यापनाच्या दृष्टीने उपयुक्त वाटणाऱ्या कांही सूचना विचारल्या होत्या. एकूण ६ अनुभवी शिक्षकानी प्रश्नावलीत काही सूचना केल्या आहेत. त्याचे स्वरूप खालील प्रमाणे -

१) विद्यार्थ्यांचे हिंदी भाषेचे लेखन, वाचन सुधारावे म्हणून सहेतूक प्रयत्न केले पाहिजेत.

२) अध्यापन प्रभावी होण्यासाठी केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणे व परीक्षेच्या दृष्टीने तयारी करून घेणे एवढेच ध्येय शिक्षकापुढे असता कामा नये.

३) अद्यावत वाचन, तसेच स्वत:च्या ज्ञानाची खोली वाढवल्याचा शिक्षकानी प्रयत्न केला पाहिजे.

४) हिंदी भाषेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची सर्वांगीण उन्नती व त्यांचा बहुमुखी विकास साधणे या बाबीकडे विषय शिक्षकानी व मुख्याध्यापकानी सतत लक्ष देणे आवश्यक आहे.

५) शिक्षकांनी आपली वृत्ती संशोधकांची ठेवली पाहिजे. या सूचना करणाऱ्या शिक्षकापैकी ३ शिक्षक इ.स. १९८९ अखेर सेवा निवृत्त होत आहेत.

संशोधकाने बार्शी तालुक्यातील ४० पालकांच्या मुलाखती घेतल्या. पैकी २० पालक बार्शी शहरातील व २० पालक ग्रामीण भागातील निवडले. शहरी भागातील १० पालक आपल्या पाल्यांच्या हिंदी अध्यापनाकडे विशेष लक्ष देत असलेले निदर्शनास आले. हे पालक आपल्या पाल्याचे गृहपाठ तपासतात. तर ५ पालक आपल्या पाल्यांकडून पाठ्यपुस्तकातील शुध्द लेखन लिहून घेतात. ग्रामीण भागातील पालकांनी आपणास आपल्या पाल्याकडे लक्ष देण्यास वेळ मिळत नाही असे सांगितले. तर ग्रामीण भागातील १० पालकानी आपल्याला हिंदी भाषा लिहता व वाचता येत नाही असे सांगितले. शहरी भागातील ८०% पालकाना हिंदी पेक्षा इंग्रजी, गणित व विज्ञान हे विषय महत्वाचे वाटतात. त्यानी

आपल्या पाल्यांना या विषयाच्या शिकवण्या लावल्या आहेत व त्या विषयाकडे त्यांना विशेष लक्ष देण्यास सांगतात. या पालकापैकी २०% पालक आपल्या पाल्याच्या शाळेत जाऊन त्यांच्या अभ्यासाची चौकशी करतात. तर ग्रामीण भागातील पालक शाळेला भेट देत नाहीत. कारण शाळेतील शिक्षकाना भेटावयाची त्यांना गरज वाटत नाही असे पालकानी सांगितले. संशोधकाने १० शिक्षकांच्या अध्यापन कार्याचे व ४०० विद्यार्थ्यांच्या अध्ययन कार्याचे निरीक्षण केले. निरीक्षणातून शिक्षकांच्या अध्यापनातील व विद्यार्थ्यांच्या वर्ग अध्यापनातील खालील उणीवा दिसून आल्या.

## हिंदी अध्यापनातील त्रुटी.

१) शिक्षकाचे हिंदी भाषेचे उच्चारण मातृभाषेप्रमाणे वाटत होते.

२) शिक्षकाना शैक्षणिक साधनांचा वापर करण्याचा सराव नव्हता.

३) प्रसंगानुसार वातावरण निर्मिती करता येत नव्हती. त्यामुळे अध्यापनात रसनिर्मिती होत नव्हती.

४) फलक लेखन मुद्देसूद नव्हते. ४ शिक्षकानी फलकावर अशुध्द लेखन केले होते.

५) विद्यार्थ्यांना योग्य पध्दतीने गृहपाठ दिले जात नव्हते.

६) दिलेले गृहपाठ तपासून त्यामधील शुध्दलेखनाच्या चुका सुधारल्या जात नव्हत्या.

७) विद्यार्थ्यांना योग्य अध्ययन अनुभव दिले जात नव्हते.

८) वर्ग नियंत्रणाकडे विशेष लक्ष नव्हते.

९) वर्गातील ठराविक विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले जात होते.

या त्रुटीबरोबर वर्ग अध्यापनात या शिक्षकांची काही वैशिष्टयेही संशोधकाला दिसून आली.

१) सदर शिक्षकापैकी ४ शिक्षकाचे हस्ताक्षर अतिशय उत्तम होते. हे ४ शिक्षक पूर्वी प्राथमिक शिक्षक होते.

२) ६ शिक्षक वर्ग अध्यापनात विद्यार्थ्याकडे व्यक्तीगत लक्ष देत होते. ५ शिक्षक हिंदी शब्दाचे उच्चारण हिंदी भाषेच्या पध्दतीने करण्याचा प्रयत्न

करतात. ४ शिक्षकांनी क्रमिक पुस्तकातील कवितांना उत्तम चाली लावल्या आहेत. तर एका शिक्षकानी पाठय पुस्तकातील कविता "टेप" करून घेतल्या आहेत.

४०० विद्यार्थ्यांपैकी ३०% विद्यार्थ्यांजवळ हिंदी विषयाचे पाठयपुस्तक नव्हते. तर १०% विद्यार्थ्यांजवळ वर्ग पाठाच्या वहया नव्हत्या. निबंध कहानी व व्याकरण या हिंदी रचनेच्या संदर्भातील महत्वाच्या भागाकडे विद्यार्थी लक्ष देत नाहीत. ५% विद्यार्थी शिक्षकाचे अध्यापन कार्य चालू असताना आपापसात बोलत होते. तर ७% विद्यार्थी गृहपाठ पूर्ण करीत नाहीत. १३% विद्यार्थ्यांच्याजवळ वर्गात हिंदी विषयाच्या वहया नव्हत्या. हे विद्यार्थी वहीच्या शेवटच्या पानावर शिक्षकांनी सांगितलेले लिहून घेत होते. ४ विद्यार्थी अध्यापन चालू असताना आपल्या वहीत चित्रपटातील नट-नटीचे चित्र काढत होते. हे विद्यार्थी शहरी भागातील आहेत, तर एक विद्यार्थी रामायणातील रावणाचे चित्र काढीत होता. ९% विद्यार्थ्यांना गणवेश नव्हता. ह्या विद्यार्थ्यांच्या पालकांची आर्थिक परिस्थिती उत्तम आहे. ६०% विद्यार्थ्यांना पाठय पुस्तक योग्य त-हेने वाचता येत नाही. परंतु हे सर्व विद्यार्थी पाठय पुस्तकातील कविता पुस्तकात न पाहता चालीवर म्हणतात. ह्या ४०० विद्यार्थ्यांपैकी १६ विद्यार्थ्यांना दीर्घ दृष्टीचा चष्मा लागला आहे. तर १५ विद्यार्थ्यांना मागील बाकावरून फळ्यावरील दिसत नव्हते. हिंदी विषयाच्या तासाला एकूण विद्यार्थ्यांपैकी ९०% विद्यार्थी हजर होते. यापैकी एकही विद्यार्थी हिंदी दैनिक वाचत नाही. तर एकूण १५ विद्यार्थी "छावा" हे साप्ताहिक वाचतात. १०५ विद्यार्थ्यांना हिंदी भाषेतील सामान्य व्याकरण नीट समजलेले नाही. १०% विद्यार्थी वर्गातील शिस्त पाळीत नव्हते व १५% विद्यार्थी वर्ग सुरु होण्यापूर्वीच्या प्रार्थनेत सहभागी होत नव्हते. १४% विद्यार्थ्यांचे प्रार्थनेकडे लक्ष नव्हते. प्रार्थना चालू असताना एकमेकांकडे पाहून डोळे मिचकावणे हसणे, चिमटे काढणे इ. माकडचेष्टा करण्यात ही मुले रमली होती.

मुख्याध्यापक व तज्ञांच्या मुलाखती -

प्रस्तुत संशोधकाने हिंदी अध्यापनाच्या सद्य:स्थितीचे चित्रण करण्याकरिता निवडक अशा १० मुख्याध्यापकाच्या व ५ हिंदी भाषातज्ञ प्राध्यापकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. यापैकी एक मुख्याध्यापक हिंदी विषयाचे पदवीधर आहेत. त्यांनी गेली २५ वर्षे हिंदी विषयाचे अध्यापन केले आहे. इतर मुख्याध्यापक या व्यवसायात गेली अनेक वर्षे काम करीत आहेत. प्राध्यापक डॉ. तिवारी हे हिंदी भाषेचे मान्यवर लेखक आहेत. तर ४ प्राध्यापक पदव्युत्तर वर्गांना हिंदीचे अध्यापन करीत आहेत. या सर्वांच्या सुदीर्घ अनुभवाचा फायदा संशोधकाने प्रस्तुत संशोधनात करून घेतला आहे. मुख्याध्यापक व तज्ञासाठी तयार केलेली "मुलाखत प्रश्नावली" परिशिष्टामध्ये जोडली आहे. या मुलाखतीतून हिंदी अध्ययन अध्यापनाची सद्य:स्थिती व हिंदी अध्यापनाचा दर्जा सुधारण्यासाठी त्यानी सुचविलेले उपक्रम या बाबीचा विचार स्पष्ट होतो. या दोन्ही बाबीवर सदर मुख्याध्यापकांनी व भाषा विषयक तज्ञानी आपली मते मुक्तपणे मांडली आहेत. येथे या मतांचा एकत्रीत विचार केला आहे.

(१) यापैकी ४ मुख्याध्यापकानी व दोन भाषा विषयक प्राध्यापकांनी भाषा हे विचाराचे माध्यम असल्यामुळे तिचे सामाजिक महत्त्व वाढविण्यासाठी विविध पध्दतीने राष्ट्रभाषेला प्राधान्य दिले गेले पाहिजे, तसेच समाजाला हिंदी भाषेविषयी आपुलकी वाटली पाहिजे असे मत व्यक्त केले, तर ६ मुख्याध्यापकांनी व २ भाषा तज्ञानी केवळ केंद्राच्या संरक्षणाने हिंदी लोकभाषा होऊ शकणार नाही, तर राज्यानेही या भाषेकडे राष्ट्रभाषा म्हणून आस्थेने पाहिले पाहिजे असे मत मांडले.

(२) ५ मुख्याध्यापकांनी भाषा विषयाच्या अध्यापनाचा बोजा इतर विषयाच्या मानाने जास्त पडतो हे मान्य केले तर पाच मुख्याध्यापक व चार तज्ञांनी, शिक्षणक्रमात इंग्रजीला जास्त प्राधान्य दिले गेल्याने व इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा असल्याने विद्यार्थी देखील हिंदी भाषेकडे दुर्लक्ष करीत आहेत असे स्पष्ट केले.

(३) या सर्व मुख्याध्यापकानी व भाषातज्ञानी प्रत्येक भाषेची भाषाशैली अथवा भाषेचा ढंग वेगळा असतो, हे विशद करून लिपीच्या संदर्भातील साम्य सोडल्यास व्याकरण, रचना व शैली यात हिंदी व इतर भाषात बराच फरक आढळून येतो असे सांगितले, म्हणून हिंदी अध्यापन करीत असताना अध्यापनात उपयुक्त असणाऱ्या विविध पध्दतीचा वापर अध्यापकाने करावा. असेही स्पष्ट केले. त्यामुळे हिंदी अध्ययन अध्यापनामध्ये रुची निर्माण करता येईल असा अभिप्राय व्यक्त केला.

(४) व्याकरणामुळे भाषा शुध्द व प्रौढ बनते. तसेच तिच्यातगुणात्मक फरक दिसून येतो. व्याकरण शिकल्यानेच विद्यार्थ्यांना भाषा येईलच असे नाही. असे सात मुख्याध्यापकानी सांगितले. तर शालेय तासीकात व्याकरण व निबंध लेखनाला विशेष प्राधान्य देण्यात यावे असे पाच भाषातज्ञानी व तीन मुख्याध्यापकानी निदर्शनास आणून दिले.

(५) हिंदी भाषा योग्य रितीने बोलता व लिहता येण्यासाठी चार मुख्याध्यापकानी व २ भाषा तज्ञानी खालील बाबीना प्राधान्य देणे आवश्यक आहे असे सांगितले. हिंदी भाषेतून स्पष्टीकरण, खडी बोलीचा वापर, सोप्या भाषेतून व्याख्यान, कहावते व मुहावरे यांचा वापर, निबंध स्पर्धा, हस्तलिखीत व वार्तापत्रक, त्याच प्रमाणे घटकानुसार योग्य अध्यापन पध्दती या त्या महत्वाच्या बाबी होत. इतरानी हिंदी भाषेचा सराव (श्रवण व भाषण) योग्य प्रमाणात दिल्या खेरीज विद्यार्थ्यांना हिंदी भाषा चांगली बोलता येणार नाही असे आपले मत असल्याचे सांगीतले.

(६) हिंदी अध्यापनात सुधारणा होण्यासाठी शिक्षण महाविद्यालयाने बरेच काही करण्यासारखे आहे, असे या मुख्याध्यापक व तज्ञांनी सांगितले. त्यापैकी त्यांच्या खालील सूचना महत्वाच्या वाटतात.

१) प्रत्येक शाळेत हिंदी भाषेचा आदर्श पाठ घेतला जावा.

२) अध्यापनाची विविध तंत्रे हिंदी अध्यापनात कशी वापरता येतील याचे प्रात्यक्षिक करून दाखवावे.

३) तालुक्यातील हिंदी शिक्षकांसाठी वर्षातून एखादे कृतीसत्र घेण्यात यावे.

४) हिंदी अध्यापनात उपयुक्त असणा-या विविध पध्दती, पाठ्यपुस्तकातील विविध घटकांना कशा उपयुक्त आहेत हे हिंदी अध्यापन करणा-या शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावे.

५) हिंदी अध्यापन करणा-या शिक्षकाचे वर्षातून ५ वेळा पाठ निरीक्षण करणारे ४ मुख्याध्यापक आहेत, दोन वेळा निरीक्षण करणारे ३ मुख्याध्यापक आहेत, तर एकदाही निरीक्षण न करणारे ३ मुख्याध्यापक आहेत. या ३ मुख्याध्यापकानी आपल्या शाळेतील अध्यापक अनुभवी असल्याने पाठ निरीक्षणाची गरज नसल्याचे सांगितले.

६) या दोन मुख्याध्यापकानी व २ भागशिक्षणाधिका-यानी शिक्षकाना येणा-या अडचणीत विद्यार्थ्याचे अपुरे शब्दज्ञान हेच कारण प्रकर्षाने सांगितले. कारण इयत्ता ५ ते ७ वी या वर्गातून येणा-या विद्यार्थ्याचे हिंदी विषयक प्राथमिक ज्ञान फारच अपुरे असते. असे त्यांनी स्पष्ट केले.

७) सर्वच मुख्याध्यापकानी व भाषा तज्ञांनी हिंदी अध्यापनाच्या सद्यःस्थितीत सुधारणा होण्याकरिता व विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्याचा विकास होण्याकरिता पालक व शिक्षक यांनी सतत जागृत राहिले पाहिजे. असे मत मांडले.

८) हिंदी विषयक तज्ञानी असे मत मांडले कि, हिंदी भाषा विद्यार्थ्यांना योग्य पध्दतीने बोलता व लिहता येण्याकरिता सुवाचन व सुलेखन याकडे

शिक्षकानी विशेष लक्ष दिले पाहिजे. हिंदी भाषेचे रूप अधिक सरळ व सुबोध केले पाहिजे. इंग्रजीला जे स्थान प्राप्त झाले आहे, ते हिंदी भाषेला देण्याचा इतर राज्यानी प्रयत्न केला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या आकलन व अभिव्यक्ती या घटकाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे असेही या तज्ञानी स्पष्ट केले. या भाषा तज्ञानी आणखी एक महत्वाचा मुद्दा मांडला तो म्हणजे अहिंदी भाषिक प्रदेशातील विद्यार्थ्यांकरीता सोपी व भाषेची आवड निर्माण करणारी पाठ्य-पुस्तके व इतर वाचनीय पुस्तकेही त्या त्या प्रदेशात निर्माण झाली पाहिजेत. छोटया वर्गाचे पाठ्यपुस्तक तयार करताना हिंदीतील क्लीष्ट वाक्यरचना टाळावी व प्रादेशिक शब्दांचा वापर व्हावा, असे दोन भाषा तज्ञानी व एका मुख्याध्यापकानी सांगितले.

यावेरीज जनभाषा म्हणून हिंदी समजावून घेणे आवश्यक कसे आहे ? याबाबत सुधाकर प्रभूनी महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेचे अध्यक्ष श्री. एस. एम. जोशी यांची घेतलेली मुलाखत ही येथे मांडली आहे. यावरून हिंदी प्रचाराच्या नव्या दिशा कोणत्या आहेत ? हे ही समजण्यास मदत झाली आहे.

हिंदी शिकणं व शिकवणं हे देशभक्तीचे कार्य असं आपण मानता का ?

होय, महात्मा गांधीनी जेव्हा इंग्रजाना त्यांच्या अहिंसक लढयात जिंकण्यासाठी जी साधनं वापरली, त्यात हिंदी शिकणं हा ही एक भाग होता. आज भारत समजून घेण्यासाठी आपण हिंदी शिकू या, असा उदार दृष्टीकोन ठेवल्यास भाषाभिमानही आड येणार नाही. तुरुंगात मी उर्दू हिंदी शिकलो. माझ्या देशसंचारात मला या भाषांनी खूप साथ दिली. आमचं राष्ट्रगीत, आमचा राष्ट्रीय झेंडा, आमची राष्ट्रभाषा आणि सत्यमेव जयते हा आमचा राष्ट्रघोषही देशभक्तीची, राष्ट्रीयतेची व राष्ट्रीय एकात्मतेची चतु:सीमा मी मानतो.

या देशातील इंग्रजीच महत्व कमी करणं, कमी होणे महत्वाचे आहे असं आपणास वाटत नाही का ?

याचं उत्तर मी वेगळ्या त-हेने देतो. आपली जनभाषा हिंदीच महत्व अधिक वाढवणं, त्यासाठी प्रयत्नशील रहाणं हे अधिक महत्वाचं. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेचा अध्यक्ष म्हणून विचार मांडतो असं नाही तर या भिन्नभाषी भारताच अंतरंग समजून एकमेकातील भारतीयता आणि भारत शक्ती वाढविण्या-साठी हिंदी शिका असं मी म्हणेन. एकमेकातील भारतीयता वाढविण्यासाठी शेजा-याची भाषा शिकणं हेही महत्वाचं. जसं राष्ट्र म्हणून आपण काही गोष्टी मानतो तसं शेजारधर्म म्हणूनही आपण काही गोष्टी मानल्या पाहिजेत. एकवेळ देशभक्ती म्हणून आपण हिंदी शिकलो. आमचं स्वातंत्र्य हिरावणा-या इंग्रज व इंग्रजाशी टक्कर देण्यासाठी हिंदी शिकलो. आता शेजारधर्म वाढविण्या-साठी शेजा-याची भाषा शिकलो तर काय बिघडलं असा विचार मांडणं, ते प्रसारित करणं हे शिक्षण संस्थाचं, शिक्षण प्रमुखाचं कार्य आहे. असं मी समजतो.

आपण राष्ट्रभाषेवरून आता शेजा-याच्या भाषेवर आलात.

जाणीवपूर्वक आलोय. हे पहा त्या त्या राज्यात मातृभाषेतून राज्यकारभार व्हावा ही अपेक्षा. शेवटी त्या त्या राज्यातील जनता राज्यकारभाराभिमुख होण्याचं ते महत्वाचं साधन. पण राज्याचे प्रश्न केंद्र सरकारात मांडण्याची भाषा कोणती असावी. हिंदीलाच स्थान मिळेल असं वाटत होत पण ते घडल नाही. काही शेजारी केंद्रात अधिकारी म्हणून असलेत तेही हे करु इच्छित नाहीत. भारतीयतेसाठी शेजा-याला जिंकणं, त्याची भाषा शिकण आवश्यक. मला महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेत घडलेली एक घटना आठवते. ती खोटी आणि ऐकीव असेल असं मला वाटत नाही. काँग्रेसचे एक काळचे अध्यक्ष संजीव रेड्डी आमच्या राष्ट्रभाषा सभेत आले होते. त्यावेळचे संस्थेचे अध्यक्ष दत्तो वामन पोतदार यांनी आपल्या भाषणात आमच्या राष्ट्रीय नेत्यांनी आपली सही कमीत कमी देवनागरीत

करावी असा विचार मांडला. त्यावर आपल्या भाषणात प्रक्षुब्ध होऊन रेड्डींनी वादंग माजविला. मी इंग्रजीत सही करतो म्हणजे देशद्रोह करतो असे नाही. असं ते म्हणाले. मी म्हणेन देशद्रोह नसेल पण ते देशप्रेमही नाही. ती भारतीयता आणि भारतभक्तीही नाही.

तुम्ही एकदा प्रचारकांना उद्देशून केलेल्या भाषणात म्हणाला होता, "हिन्दीचा प्रचार अनाग्रही वृत्तीनं करा. हा अनाग्रहाचा आग्रह कशासाठी व का ?"

त्याचं असं आहे. प्रचाराची व प्रचारकाची एक शक्ती असते. शक्तीलाही शील असलं पाहिजे. मी १९६६ मध्ये मद्रास येथे दक्षिण भारत प्रचार सभेच्या पदवीदानाला गेलो होतो. मी माझं भाषण हिंदीतून केलं तेव्हा उपस्थित असलेल्या राजगोपालचारींनी इंग्रजीतून भाषण केलं. राजगोपालचारी हे एकाकाळचे हिंदीचे कट्टर प्रचारक. दुसऱ्या दिवशी भेटीत मी त्याना म्हटलं. "राजाजी तुम्ही तर या भूमीत प्रचाराचा पाया घातलात. आज तुमची भूमिका हिंदी विषयी आत्मीयता वाढवणारी नाही. राजाजी म्हणाले "हो लादलं जातं त्याविषयी कोणालाही आत्मीयता वाटत नाही. इंग्रजानी इंग्रजी लादली म्हणून आम्ही हिन्दी स्वीकारली. आता उत्तर भारतीय हिन्दी लादण्याच्या उद्योगाला लागलेत म्हणून हा निषेध. त्रिभाषासूत्राची पायमल्ली होऊ देऊ नये. हिन्दी लादण्यापेक्षा हिन्दी साहित्यकारांच्या कथाविश्वातून त्यांच्या नायक नायिकांच्या दृष्टीकोनातून हिंदीच्या प्रचारकांना हिंदीचे प्रेम वाढवता येईल. तुमचा प्रेमचंद मी फार वाचला नाही पण जेवढा ऐकला, वाचला त्यावरून तो जनतेचा लेखक होता. या प्रेमचंद साहित्याच्या प्रचारा-प्रसारातूनही हिन्दीप्रेम जागवता येईल. त्यासाठी एकवेळ मिशनऱ्याच्या भूमिकेतून प्रचारकांनी प्रचार केला. आज ते मिशन, त्याची तीव्रता कमी झाल्यासारखं वाटतं.

BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

तुम्ही मघाशी म्हणालात, "हिन्दी पढो और आगे बढो," शेवटी हिन्दीमुळं माझा व्यवसायाचा, नोकरीचा प्रश्न मिटला अशी भावना सर्वसामान्य जनमानसात असणं हे चुकीचं आहे का ?

असं असणं हे अर्धसत्य आहे. हिन्दीमुळं व्यवसाय मोठा होतो, तुम्ही मोठे होता. आमचे मराठी तर हिन्दी शिकतील तर राष्ट्रीय स्तरावर जातील. आता राष्ट्रीकृत व्यवसायात हिन्दी अधिका-याच्या जागा आहेत. हिन्दी अधिका-याच्या जागा हिन्दी शिकणा-यालाच मिळतील. त्या आज तुलनेनं थोडया आहेत. पण आपण अधिकारी बनलो, काम वाढवलं तर हिन्दीसाठी अधिक नौकरी क्षेत्र निर्माण होईल. बँक व्यवसायाचं उदाहरण घ्या. बँकही आमच्या खेडयात पोहचल्यात. खताचे, रसायनाचे राष्ट्रीकृत उद्योग त्यांच्या जाहिराती व देशी व हिंदी माध्यमातून झळकतात. जनभाषा व शेजा-याची भाषा शिकली तर या व्यवसायात पुष्कळ स्थान आहे. शेवटी व्यवसायाचं व्यापारीकरण वाढत आहे. व्यापारासाठी जाहिराती आवश्यक आहेत. कंपन्या जाहिरातीसाठी शेजा-याच्या भाषेवर प्रभुत्व असलेल्या कुणाचीही मदत घेतात. राष्ट्रीकृत व्यवसायातील हिन्दी अधिका-याची पदं रिकामी राहतात. त्यांना हिन्दी नको आहे. ते या स्थितीचा लाभ उठवतात. बँक ऑफ महाराष्ट्र ही महाराष्ट्रातील अग्रगण्य बँक आहे. या बँकेने हिन्दी विभागात लक्षणीय काम केलं. राजभाषा समितीनं ते गौरवलं. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेतील माजी अधिका-याना ते श्रेय जाते. सिमित क्षेत्रातील काम वाढवणं आणि अनेकांना कापड उपलब्ध करुन देणं, त्यासाठी हिन्दी हे मोठं साधन आहे. या साधनाचा प्रभावी उपयोग व्यक्तीला समाजाला, देशालाही मोठा करतो म्हणून मी म्हटलं "हिन्दी पढो और आगे बढो". हिन्दी जनभाषा झालीच आहे. "दूरदर्शनसारख्या माध्यमाने ते सिध्द केले आहे. आज वस्तूच्या केवळ जाहिराती देत आहेत. उद्या ते व्यवसायासाठी कार्यक्रम देतील. व व्यापारी करणात ते अटळ आहे. महाराष्ट्रातील तरूण रक्ताला या देशाची जनभाषा समजून घेण्याचे आवाहनच

राहील व पुढे जाण्याचा महामार्ग राहील. पुढे जाण्यासाठी मतभेद दूर व्हावेत शेजारधर्म वाढावा, आपलेपणा वाढावा, व राष्ट्रीय एकात्मतेसाठी हिन्दी असा या जनभाषेचा जयजयकार व्हावा.

विद्यार्थ्यांच्या मुलाखती -

संशोधकाने आपल्या संशोध्य विषयाकरिता बार्शी तालुक्यातील १०० विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या आहेत. या मुलाखतीद्वारा विद्यार्थ्यांचा हिंदी भाषेकडे पहाण्याचा दृष्टीकोन तसेच त्याची हिन्दी या विषयाची तयारी वाचन, लेखन इ. कार्य पाहण्याचा प्रयत्न केला आहे.

या १०० विद्यार्थ्यापैकी ७० विद्यार्थ्यांनी आपणास मराठी हा विषय मनापासून आवडत असल्याचे सांगितले. कारण मराठी पाठ्य पुस्तकातील पाठाचे आकलन आपणास लवकर होते. तसेच मराठीचे पाठ्यपुस्तक वाचण्यास सोपे वाटते. असे त्यांनी सांगितले. या १०० विद्यार्थ्यापैकी फक्त १५ विद्यार्थ्यांनी हिंदी विषय आपणास आवडतो असे सांगितले. याचे कारण स्पष्ट करताना या विद्यार्थ्यांनी सांगितले की, हिंदी चित्रपट आपणास चांगले समजतात व हिंदी भाषेतील दूरदर्शनवरचे कार्यक्रम अधिक मनोरंजक वाटतात. या विद्यार्थ्यांच्या घरी दूरदर्शनची सोय आहे. त्यामुळे त्याना हिंदी भाषेविषयी प्रेम निर्माण झाले आहे. हे विद्यार्थी दूरदर्शनवरून प्रसारीत होणारे कार्यक्रम आवडीने पाहतात. हिंदी विषय न आवडण्याची कारणे सांगताना या ७० विद्यार्थ्यांनी असे स्पष्ट केले की, आपणास हिंदी बोलता येत नाही. तसेच हिंदीचे पाठ्यपुस्तक क्लीष्ट वाटते. त्यातील धडे वाचण्यास वेळ लागतो व कविताना नीट चाली लावता येत नाहीत. तसेच हिंदी बोलण्याचा प्रसंग आपणावर सहसा येत नाही. घरीही हिंदी बोलले जात नाही. त्यामुळे आपणास हिंदी हा विषय आवडत नाही असे आपले मत मांडले.

या १०० विद्यार्थ्यांपैकी ९७ विद्यार्थ्यांजवळ हिंदीचे पाठ्यपुस्तक होते. ३ विद्यार्थ्यांजवळ ते नव्हते. त्यानी आपले पाठ्यपुस्तक हरवले असल्याचे सांगितले. तर ४९ विद्यार्थ्यांच्या जवळ नवनित हे हिंदी मार्गदर्शक होते. हे विद्यार्थी नवनित मार्गदर्शकात पाहून आपला गृहपाठ पूर्ण करतात. त्यानी आपण पाठ्यपुस्तकाबरोबर "गाईड" आणल्याचे सांगितले. त्यामुळे आपणास गृहपाठ लवकर पूर्ण करता येतो. व पूर्ण पुस्तक वाचण्याची गरज भासत नाही असे सांगितले. या "गाईड" वापरणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांच्या पालकांची आर्थिक स्थिती वरच्या दर्जाची होती. ४५ विद्यार्थ्यांनी आपले विषय शिक्षक कोणतेच शैक्षणिक साधन वर्ग अध्यापनात वापरत नसल्याचे सांगतात. शैक्षणिक साधने न वापरणाऱ्या शिक्षकाचे प्रमाण शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात अधिक आहे. फक्त २% ग्रामीण भागातील शिक्षक शैक्षणिक साधनांचा वापर करतात. ५५ विद्यार्थ्यांनी आपले शिक्षक वर्षातून ४ ते ५ वेळा शैक्षणिक साधनांचा वापर करतात असे सांगितले. या साधनामध्येही चित्रे व नकाशे याखेरीज इतर साधनाचा वापर होत नसल्याचे त्यानी सांगितले. २९ विद्यार्थ्यांनी आपणास हिंदीच्या तासाला वर्गात बसणे आवडत नसल्याचे सांगितले. कारण शिक्षकांनी शिकवलेले आकलन होत नाही. शिक्षक पाठ्यपुस्तक वाचून दाखवतात. ठराविक विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले जातात. प्रश्नाचे उत्तर चुकल्यास वर्गात अपमान केला जातो. इत्यादी बाबी त्यानी सांगितल्या. या १०० विद्यार्थ्यांपैकी ६५ विद्यार्थ्यांना पहिल्या दोन घटक चाचणीत ६० ते ६५% गुण मिळाले आहेत. बाकीच्या ३० विद्यार्थ्यांना ४० ते ४५% गुण मिळाले आहेत. तर ५ विद्यार्थी घटक चाचणीला गैरहजर होते. पैकी २ विद्यार्थी आजारी असल्यामुळे व ३ विद्यार्थी आपला अभ्यास न झाल्यामुळे घटक चाचणीस आपण बसलो नाही असे सांगितले.

१०० विद्यार्थ्यांपैकी रोज हिंदीचा १ तास अभ्यास करणारे १४ विद्यार्थी आहेत. अर्धा तास अभ्यास करणारे ५० विद्यार्थी तर ३६ विद्यार्थी आठवड्यातून २ तास अभ्यास करणारे आहेत. रोज १ ता. अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण अल्प आहे. याच विद्यार्थ्यांना घटक चाचणीत ६० ते ६५% गुण आहेत. तसेच त्यांच्या ६ वी च्या वार्षिक परीक्षेत त्यांना ७०% पेक्षा जास्त गुण आहेत. आठवड्यातून २ ता. अभ्यास करणारे विद्यार्थी हे हिंदी मार्गदर्शनातून अभ्यास करणारे आहे. ते आपले हिंदी विषयाचे पाठ्य पुस्तक वाचीत नाहीत. तर अर्धा तास अभ्यास करणारे ५० विद्यार्थी शिक्षकांनी सांगितलेला गृहपाठ पाठ्य-पुस्तकाच्या मदतीने पूर्ण करतात. त्यानी सांगितले की, रोज अर्धा तास हिंदी विषयाच्या अभ्यासास पुरेसा वाटतो.

या १०० विद्यार्थ्यांपैकी ४०% विद्यार्थ्यांच्या घरी त्याना अभ्यासाला योग्य वातावरण मिळत नाही. प्रामुख्याने आपणास जागेची अडचण असल्याचे या विद्यार्थ्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थी मात्र आपणास अभ्यासा-करिता शांत जागा उपलब्ध होते परंतु सुगीच्या दिवसात शेतीची कामे करावी लागतात त्यामुळे या काळात शाळा बुडते व अभ्यासाकडे दुर्लक्ष होत असल्याचे सांगितले. या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी महत्वाची सूचना केली की सुगीच्या काळात शाळेनी सुट्टी जाहीर करावी.

वरील विद्यार्थ्यांपैकी ११ विद्यार्थी हिंदी भाषेतील इतर पुस्तके वाचतात. या इतर पुस्तकात फिल्म जगत "माधुरी" "धर्मयुग" ही साप्ताहिके आहेत. इतर बाल साहित्य हे विद्यार्थी वाचत नाहीत. हे सर्व विद्यार्थी शहरी भागातील असून, त्यांचे पालक उच्च शिक्षित आहेत. तसेच बार्शी शहरातील २ विद्यार्थी लोक वाचनालयातील हिंदी दैनिक रोज वाचतात. व एक विद्यार्थी "केअर" हे आरोग्यविषयक माहिती सांगणारे मासिक वाचतो. एकंदरीत विद्यार्थी पाठ्यपुस्तकाखेरीज इतर वाचन करीत नाहीत असे निदर्शनास आले. याचे कारण

विद्यार्थ्यांनी असे सांगितले की आपणास हिंदी विषयातील वाचनास सुलभ अशी पुस्तके सहजासहजी उपलब्ध होत नाहीत. ६२ विद्यार्थ्यांनी "सिंहासन के दावेदार" व "स्मृती" हे पाठ्यपुस्तकातील दोन पाठ कठीण वाटत असल्याचे सांगितले. हेच पाठ शिक्षकांनीही संदर्भ लागत नाही व कठीण विषय या सदराखाली मोडतात असे सांगितले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपेक्षा शहरी भागातील विद्यार्थ्यांचे हिंदी तास बुडविण्याचे प्रमाण कमी आढळून आले. ग्रामीण भागातील विद्यार्थी सुगी, बाजार, जत्रा इ. कारणाने शाळेतच जाण्याचे टाळतात.

ड

पालकांच्या मुलाखती -

संशोधकाने बार्शी तालुक्यातील ४० पालकांच्या मुलाखती घेतल्या. त्यापैकी २० पालक ग्रामीण भागातील आहेत. सदर पालकानी मुलाखतीला उत्तम प्रकारचा प्रतिसाद दिला. ग्रामीण भागातील पालकांच्या मुलाखतीस अनेक अडचणी आल्या. त्यापैकी सर्वात मोठी अडचण म्हणजे पालकांच्या भेटी घेणे होय. संशोधकाला या पालकांच्या भेटी त्यांच्या शेतात जाऊन घ्याव्या लागल्या.

मुलाखतीतील ११ पालक आपल्या पाल्याच्या स्वाध्यायाकडे लक्ष देतात. ते त्यांच्या गृहपाठाच्या वह्या पाहतात. तसेच त्यांना सक्तीने अभ्यास करण्यास भाग पाडतात. सदर पालकापैकी ७ पालक सुशिक्षित व नौकरदार आहेत. त्यांच्या गृहीणी देखील पदवीधर आहेत.

शहरी भागातील ९ पालकानी आपणास पाल्याकडे लक्ष देण्यास वेळ मिळत नाही असे सांगितले. यापैकी ५ पालक व्यापारी आहेत तर ४ पालक मजुरी करतात. व्यापारी पालकांनी आपणास व्यवसायात माणसाची गरज भासत असल्यामुळे १० वी नंतर आपल्या पाल्याचे शिक्षण बंद करणार आहोत असे सांगितले.

ग्रामीण भागातील १७ पालक पाल्यांच्या अभ्यासाकडे लक्ष देत नाहीत. कारण त्यांनी सर्व जबाबदारी शिक्षकांवर सोपविली आहे. ३ पालक आपल्या पाल्यांकडे विशेष लक्ष देतात. हे ३ पालक शिक्षक आहेत.

शहरी भागातील १४ पालकानी शिक्षकाकडून खालील अपेक्षा असल्याचे सांगितले. त्या अशा -

१) शिक्षकांनी शाळेत जादा तास घ्यावेत.

२) पाठय पुस्तकाव्यतिरीक्त इतर पुस्तके पाल्यांना वाचावयास द्यावीत.

३) शुध्द लेखन व व्याकरण याकडे विशेष लक्ष देण्यात यावे.

४) विद्यार्थ्यांच्या पाठांतरावर भर देण्यात यावा.

५) लेखी परीक्षा बरोबर तोंडी परीक्षा घेण्यात याव्यात.

६) शाळेत हिंदी विषयाच्या वक्तृत्व स्पर्धा घेण्यात याव्यात.

शाळेला भेट देऊन आपल्या पाल्यांची चौकशी करणाऱ्या पालकाचे प्रमाण शहरी भागात जास्त आहे. या २० पालकापैकी ६ पालक महिन्यातून एकदा शाळेला भेट देतात. तर ४ पालक वर्षातून दोनदा भेट देतात. ग्रामीण भागातील पालक शाळेला भेट देत नाहीत. याचे कारण विचारले असता पालकांनी सांगितले की रोजच शिक्षकांची व आपली भेट होते. त्यामुळे शाळेत जाण्याची गरज भासत नाही.

आपल्या पाल्याने कोणत्या व्यवसायात प्रवेश करावा असे आपणास वाटते. असे विचारले असता, या ४० पालकापैकी ११ पालकांनी आपला पाल्य डॉक्टर व्हावा, ७ पालकांनी इंजिनिअर व्हावा, तर दोन पालकानी प्राध्यापक व्हावा असे सांगितले. ग्रामीण भागात राहणाऱ्या ३ पालकांनी आपल्या मुलाने डॉक्टर होऊन गावातच दवाखाना काढावा असे वाटत असल्याचे सांगितले. तर ४ पालकानी आपला पोरगा फौजदार करायचा आहे. त्याकरिता काय करावे लागेल असा सल्ला विचारला. १३ पालकानी आपण पाल्यांस शाळेत

पाठवतो पण त्याने काय व्हावे याचा विचार केला नाही असे सांगितले. एकंदरीत ग्रामीण भागापेक्षा शहरी भागातील पालकांचे लक्ष आपल्या पाल्यावर अधिक प्रमाणात असल्याचे दिसून आले. या ४० पालकांपैकी १६ पालकांनी पाल्यास विज्ञान शाखेकडे पाठवणार असे सांगितले. यापैकी ३ ग्रामीण भागातील आहेत. ४ पालक पाल्यास कॉमर्स शाखेकडे पाठवणार आहे तर १ पालक पाल्यास हिंदी घेऊन एम.ए.करावयास सांगणार आहेत. ते पालक हिंदी विषयाचे प्राध्यापक आहेत.

संशोधकाने वरील विविध मार्गांनी "बार्शी तालुक्यातील माध्यमिक शाळातील इयत्ता ८ वी च्या हिंदी अध्यापनाचा चिकित्सक अभ्यास" केला आहे.